
वर्ष-०८ | अंक-०५ | मुंबई, मंगळवार २१ ते २७ डिसेंबर २०२१ | पृष्ठ-४
मूल्य २/- रुपये
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024
पोलीस बातमी पत्र
पोलीस बातमी पत्र
●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 जिल्ह्यात 3 दिवसांत 3 शाळकरी विद्यार्थ्यांचा मृत्यू
3 → घणसोली विभागातील अनधिकृत बांधकामांवर तोडक कारवाई
मटण कापण्याच्या सुरीने पत्नीची हत्या, पतीची तलावात उडी, दाम्पत्यातील वादाचं कारण काय? ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## घराचं दार तोडून झोपलेल्या दाम्पत्यावर सपासप वार, नालासोपाऱ्यात खळबळ



नालासोपारा : घराचे दार तोडून झोपेत असणाऱ्या पती-पत्नीवर हल्ला करण्यात आला होता. मुंबईजवळच्या नालासोपारा परिसरात ही धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका अनोळखी माथेफिरु तरुणाने धारदार हत्याराने दाम्पत्यावर प्राणघातक वार केले. हल्ल्यानंतर आरोपी फरार झाला आहे. काय आहे प्रकरण? नालासोपारा पूर्व भावशेत पाडा येथे शनिवार पहाटे 3 वाजताच्या सुमारास ही घटना घडली आहे. या घटनेत पती-पत्नीच्या गळ्यावर, छातीवर वार झाल्याने दोघेही गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर शताब्दी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. उत्तर प्रदेशचे जोडपे, नालासोपाऱ्यात वास्तव्य ...पान २ वर...

## अमित शहांचं आव्हान राऊतांनी स्वीकारलं, म्हणाले ही तीन चिलखतं दूर करा आणि लढा





नवी दिल्ली, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पुण्यात भाषण करताना शिवसेनेवर निशाणा साधला. यासोबतच राजीनामा देऊन निवडणुकीला सामोर जा, तिघांविरोधात लढा. मग बघा काय अवस्था होते' असं म्हणत अमित शहा यांनी थेट मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना आव्हान दिले होते. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना दिलेल्या या ओपन चॅलेंज नंतर शिवसेनेचे नेते संजय राऊत यांनी अमित शहांना प्रत्युत्तर दिलं आहे. भ्रमीत करण्याचा प्रयत्न सुरू संजय राऊत म्हणाले, अमित शहाजी काल पुण्यात आले आणि त्यांचं जे काय वक्तव्य आहे ते पूर्णपणे असत्याला धरून आहे. ते नक्की खरं काय बोलले हे आम्ही शोधण्याचा प्रयत्न करत होतो. आमच्या नेत्याविषयी, आमच्या भूमिकांविषयी, आमच्या हिंदुत्वाविषयी प्रश्न उपस्थित करुन महाराष्ट्राच्या आणि देशाच्या जनतेला गेल्या दोन, अडीच वर्षांपासून भ्रमीत करण्याचा प्रयत्न सुरू आहे. पण जनता विश्वास ठेवायला तयार नाही. भाजप नेते वैफल्यातून बोलतायत भाजपचं हे वैफल्य मी राज्यातील नेत्यांमध्ये पाहतोय, पण त्यांचे सर्वोच्च केंद्रीय नेतेही महाराष्ट्रात येऊन त्याच वैफल्यातून बोलत आहेत. हे जेव्हा मी पाहिले ...पान २ वर...

## आधी महागड्या बाईक उचलायच्या, मग त्यावरुनच धूम स्टाईल चोरी, कल्याणमध्ये चोर अटकेत

कल्याण : कल्याणच्या कोलशेवाडी पोलिसांनी एका सराईत चोरट्याला सापळा रचून अटक केली आहे. अलीहसन जाफरी असं या चोरट्याचं नाव आहे. जाफरी आधी महागड्या बाईक्स चोरायचा, त्यानंतर त्यावर बसूनच महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या धूम स्टाईल लांबवायचा. काय आहे प्रकरण? 22 वर्षीय अलीहसन हा सराईत गुन्हेगार आहे. चेन



स्नॅचिंग आणि दुचाकी चोरीमध्ये त्याचा हातखंडा आहे. चेन स्नॅचिंग करण्यासाठी तो आधी महागड्या दुचाक्या चोरायचा, त्यानंतर या चोरलेल्या दुचाकीवर बसून सोनसाखळ्या चोरायचा. त्यानंतर दुचाकी रस्त्यात उभी करून तेथून पळ ...पान २ वर...

## मुंबईत 31 डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचे ऑपरेशन ऑल आऊट; रस्त्यावर उतरत केली वाहनांची तपासणी



मुंबई : थर्टी फस्टच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी मुंबईत ऑपरेशन ऑल आऊटला सुरुवात केली आहे. या अंतर्गत रेकॉर्डवर असलेल्या गुन्हेगारांचा शोध घेण्यात येत आहे. तसेच अनेक ठिकाणी नाकाबंदी करून वाहनांची तपासणी देखील करण्यात येत आहे. वाहतुकीचे नियम मोडणारे व कोरोनाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या नागरिकांवर कारवाई सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. मध्यरात्री पोलिसांकडून वाहनांची तपासणी थर्टी फस्ट अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. नवीन वर्षाच्या स्वागताची सर्वांनाच उत्सुकता असते. मात्र या काळात दरवर्षी मद्यपान करून गाडी ...पान २ वर..

## Paytm Spoofing करुन व्यवहार झाल्याचे भासवून फसवणुक करणा-या गुन्हेगारास अटक.



मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयील सायबर गुन्हे कक्ष येथे संदीप हणमंतराव शिंदे, हे औषध वितरक असून दि.२७/१०/२०२१ रोजी मोबाईल क्रमांक ७९७७४७२४२० चा धारक याने हेडॉन इंजेक्शन या औषधाची मागणी नोंदविली व ऑनलाईन पेमेंट करणार असल्याचे सांगून त्यांच्या व्हॉटसअप वरुन पेटीएम पेमेंट केल्याबाबतचे दोन स्क्रिनशॉट व्हॉटसअप शिंदेयांना पाठवून मोबाईल वरती ऑनलाईन पेमेंट केल्याचे भासवुन एकुण रूपये १७,३७०/- ची फसवणूक केली आहे.अशी तक्रार नोंदविली होती.

सदर तक्रारी च्या अनुषंगाने पोलीस उपनिरीक्षक शेनोळकर यांनी सदर व्यवहाराबाबत पेटीएम पेमेंट बँक यांचेबरोबर संपर्क साधला असता सदरचे व्यवहार हे प्रत्यक्षात न होता बनावट/फसवे Paytm Spoofing असल्याचे निष्पन्न झाले. सदर अर्जाचे अनुषंगाने मोबाईल ...पान २ वर...

## अंधेरीत पाण्याने भरलेल्या लिफ्टच्या खड्ड्यात पडून 7 वर्षांच्या मुलाचा मृत्यू, इमारतीच्या पर्यवेक्षकावर गुन्हा दाखल



मुंबई : बांधाकामाधीन इमारतीच्या पाण्याने भरलेल्या लिफ्टमध्ये पडून बुडाल्याने एका 7 वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना अंधेरीत घडली आहे. निर्माणाधीन इमारतीत सुरक्षेच्या पुरेशा उपाययोजना न केल्याने साईट पर्यवेक्षक आणि इतरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर इमारतीच्या तळमजल्यावर विवाहाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खेळता खेळता हा मुलगा पाण्याने भरलेल्या खड्ड्यात ...पान २ वर...

## शॉरमातून गोल्डबार, अंतर्वस्त्रातून सोन्याची पावडर, मुंबई विमानतळावर 18 केनियन महिला सापडल्या

मुंबई : मुंबईतील कस्टम विभागाच्या एअर इंटेलिजन्स युनिटने 18 केनियन महिलांना ताब्यात घेतले होते. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी ही कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून 1.55 कोटी रुपये किमतीचे 3.85 किलो वजनाचे सोने जप्त करण्यात आले आहे. शॉरमा कॉफीच्या बाटल्या, शूज यांच्यामधून सोन्याची तस्करी करण्यात येत होती. धक्कादायक म्हणजे काही जणींनी अंतर्वस्त्रातही पावडर स्वरुपात सोनं लपवलं होतं. काय आहे प्रकरण? केनियाच्या नागरिक असलेल्या 18 महिला नैरोबीहून (Nairobi) शारजामार्गे (Sharjah) भारतात आल्या होत्या. शॉरमा, कॉफीच्या बाटल्या, बूट यातून त्यांनी सोन्याचे लहान बार लपवून आणले होते. सूत्रांच्या केली आहे. परवानगीयोग्य मर्यादेपेक्षा अधिक सोने बाळगल्याबद्दल कारवाई करण्यात



माहितीनुसार त्यांच्या अंडरगारमेंट्समध्येही काही सोने सापडले. सर्व जणी एकाच फ्लाईटने प्रवास करत होत्या. एका महिलेला अटक एअर इंटेलिजन्स युनिटने आतापर्यंत एका महिलेला अटक आली. तर उर्वरित 17 महिलांना ताब्यातील सोने जप्त करुन सोडून देण्यात आले. या महिला कुठल्याही स्मगलिंग रॅकेटचा भाग नसल्याचं आतापर्यंतच्या चौकशीत समोर ...पान २ वर...

## मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक १ भाईंदर पश्चिम महेश्वरी भवन व स्व. कल्पना चावला अग्निशमन केंद्रासमोर असलेल्या पदपथावरील एकूण १५ अनधिकृत झोपड्यांवर तोडक कारवाई







मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात येत असून गेल्या काही आठवड्यापासून अशी अनधिकृत बांधकामे जमिनदोस्त केली जात आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका उपायुक्त (अतिक्रमण विभाग) मारुती गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली विविध प्रभागातील अनधिकृत बांधकामांचा आढावा घेऊन यावेळी झालेल्या बैठकीत उपायुक्तांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना त्यांच्या प्रभागातील अनधिकृत बांधकामे, अनधिकृत झोपड्या, फेरीवाले, गॅरेजेस, पदपथावरील व्यावसायिक, अनधिकृत होर्डिंग्ज, अनधिकृत झोपड्या यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्याचप्रमाणे प्रभागातील अनधिकृत बांधकामांवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी असणाऱ्या अभियंता व बीट निरीक्षक यांनी दुर्लक्ष केल्यास त्यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुद्ध कारवाईचे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश प्रभाग अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. दिनांक १६ डिसेंबर २०२१ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ कार्यक्षेत्रात भाईंदर पश्चिम महेश्वरी भवन व स्व. कल्पना चावला अग्निशमन केंद्रासमोर असलेल्या पदपथावरील एकूण १५ अनधिकृत झोपड्यांवर तोडक कारवाई करण्यात आलेली आहे. सदरची कारवाई आयुक्त दिलीप ढोले यांच्या आदेशान्वये, उपायुक्त (अतिक्रमण) मारुती गायकवाड, अतिक्रमण विभाग प्रमुख नरेंद्र चव्हाण, सहाय्यक आयुक्त प्रभाकर म्हात्रे, सहाय्यक आयुक्त चंद्रकांत बोरसे, कनिष्ठ अभियंता योगेश भोईर, कनिष्ठ अभियंता संदीप जटाळकर, कनिष्ठ अभियंता वैभव कुल्थे व अतिक्रमण विभागाचे कर्मचारी यांच्या उपस्थितीत सदर कारवाई करण्यात आली.

# जिल्ह्यात ३ दिवसांत ३ शाळकरी विद्यार्थ्यांचा मृत्यू



हिंगोली : मागील काही दिवसांपासून वाहन चालकाच्या निष्काळजीपणामुळे अपघाताच्या घटनांत सातत्याने वाढ झाल्याचे दिसून येत आहेत. वाहन चालकाचा निष्काळजीपणा हा नागरिकांच्या जिवावर बेतत आहे. हिंगोली जिल्ह्यात मागील तीन दिवसांत तीन शालेय विद्यार्थ्यांचा वेगवेगळ्या घटनेमध्ये दुर्देवी मृत्यू झाला आहे. त्यामुळे जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे.

यामध्ये तालुक्यातील कुरुंदा येथून सायकलवर घराकडे जाताना पाचवीच्या वर्गात शिकत असलेल्या संकेत सचिन महाजन वय ११ वर्ष याचा मृत्यु झाला आहे. तर सेनगाव ते हिंगोली रोडवर नरसी येथे हिंगोलीच्या दिशेने कॉलेजला जात असताना भरधाव भरधाव जीपने जांबरून येथील एकनाथ हरिभाऊ जुमडे वय १८ वर्ष याचा जागीच मृत्यू झाला. तर सेनगाव तालुक्यांतील पळशी येथिल सोमनाथ लक्ष्मण वाबळे वय १३ याला सांबळखेडा येथे एका ग्रामसेवकांने भरधाव जीप ने उडविले आहे. यामध्ये सोमनाथ यामध्ये सोमनाथचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी ग्रामसेवक अंगत ज्ञानबा गोरे रा. पळशी यांच्या विरुध्द गोरेगाव पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मागील तीन दिवसात त्यांचा दुर्दैवी मृत्यूने शोककळा पसरली असून शाळेत विद्यार्थ्यांना पाठवत असताना आपल्या पाल्याची विशेष काळजी घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

# मित्रानेच केला मित्राचा घात चोरी नंतरच्या वादातून झालेला बेबनाव जीवावर बेतला

हिंगोली : २५ वर्षीय तौफिक खान खूनप्रकरणातील आरोपी सागर डुकरे याला चंदनझिरा पोलिसांनी सिंदखेड राजा येथून जेरबंद केले. परवा रात्री मयत तौफिक खान आणि आरोपी सागर डुकरे या दोघांनी नशेच्या गोळ्या सेवन केल्या. त्यानंतर त्यांनी रात्री जुना जालना परिसरातील शनी मंदिर परिसरात आणि उड्डाणपुलावर लुटमारीच्या दोन घटना केल्या. एका घटनेत एका व्यक्तीस मारहाण करून त्याचा मोबाईल आणि रोख रक्कम लुटली तर दुसऱ्या घटनेत अजून एकाचा मोबाईल हिसकावून पाळून गेल्याचे समजते आहे.

नशेच्या धुंदीतच सागर डुकरे आणि तौफिक हे दोघे सागरच्या मोटरसायकलवरून औरंगाबाद रोडवरील बारवाले कॉलेजच्या मागील पडीत जागेत गेले. तिथेच त्यांच्यात वादावादी झाल्याने सागर डुकरे याने त्याच्या सोबत असलेल्या लोखंडी पाइपने तौफिक याच्या डोक्यावर वार केले. त्यात तो मरण पावल्यानंतर सागर डुकरे याने तेथून पळ काढला. दरम्यान, या प्रकरणातील मयत तौफीक आणि आरोपी सागर डुकरे दोघेही सराईत गुन्हेगार असून त्यांच्याविरुद्ध विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असल्याचे कळते आहे. जोपर्यंत आरोपीला ताब्यात घेण्यात येत नाही तोपर्यंत मयताला घेऊन जाणार नाही, असा पवित्रा संतप्त नातेवाईकांनी घेतला. त्यामुळे परिसरात तणाव निर्माण झाला होता. मृत तरुणांच्या नातेवाईकांनी बराच वेळ पोलिसांशी हुज्जत घातल्याने DYSP निरज राजगुरू यांनी



घटनास्थळी धाव घेतली. यावेळी स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी या नातेवाईकांना समजावून उत्तरीय तपासणीसाठी मृत तरुणाचे शव घाटी रुग्णालयात पाठविण्यात आले. जिल्हा पोलीस अधिक्षक विनायक देशमुख यांनी देखील घटनास्थळी पोहचून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळाची पाहणी केली.

# कॉलेजला जाण्याचा ठरला अखेरचा दिवस



हिंगोली : अनेक महिन्यांपासून महाविद्यालय बंद होती. त्यामुळे शाळा, महाविद्यालय पुन्हा कधी एकदा सुरू होतात अशी आतुरता विद्यार्थ्यांना होती. महाविद्यालय सुरू झाल्यानंतर नव्या उमेदीने महाविद्यालयांमध्ये जात असताना हिंगोलीमध्ये एका भरधाव जीप चिरडल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

हिंगोली सेनगाव रोडवर बाहेती पेट्रोल पंपाच्या समोर क्रुझर जीप वाहनाची दुचाकीस धडक बसल्याने दुचाकीवरील महाविद्यालयीन विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची घटना आज सकाळी ७:१५ वाजताच्या सुमारास घडली आहे.

हिंगोली तालुक्यातील जांभरून आंध येथील एकनाथ हरिभाऊ जुमडे वय १८ वर्ष हा हिंगोली येथे इयत्ता बारावीमध्ये शिक्षण घेत असून तो नेहमीप्रमाणे हिंगोली येथे महाविद्यालयांमध्ये आपल्या एम एच ३८ वाय ०६३० या दुचाकीवरुन जात असताना सदरील दुचाकी पेट्रोल पंपाच्या समोर रोडवर येत असताना हिंगोली येथून सेनगावकडे जात असलेल्या क्रुझर जीप एम एच ३८-७१९७ या वाहनाची जोराची धडक बसली.

दुचाकीवरील एकनाथ जुमडे हा हाविद्यालयीन तरुण अपघातात जब्बर जखमी झाल्याने नर्सी पोलीस ठाण्याचे पोउपनि अशोक कांबळे, गणेश जाधव यांनी जखमीस वाहनांमध्ये टाकून प्रथम नर्सी आ केंद्रात घेऊन गेले. परंतु, आरोग्य केंद्र बंद असल्याने हिंगोली येथे उपचारासाठी नेत असताना सदरील जखमीचा वाटेतच मृत्यू झाला आहे. या प्रकरणी सध्या कुठल्या गुन्ह्याची नोंद झाली नसून पोलीस अधिक तपास करीत.

एकनाथ जुमडे या विद्यार्थ्याच्या जाण्याने, महाविद्यालय व गावावर शोककळा पसरली आहे.

# नवी मुंबई शहर स्वच्छतेत आता विविध स्वयंसेवी संस्थांचा पुढाकार



'स्वच्छ सर्वेक्षण 2022' चे 'नागरिकांना प्राधान्य (People First)' हे बोधवाक्य जाहीर करण्यात आले असून नवी मुंबई महानगरपालिकेने त्याआधी 15 ऑगस्ट पासूनच 'माझं शहर - माझा सहभाग' हे घोषवाक्य नजरेसमोर ठेवून स्वच्छतेचे पुढचे पाऊल टाकण्यास सुरूवात केलेली आहे. सर्वेक्षण हा स्वच्छतेच्या तपासणीचा एक महत्वाचा भाग असला तरी स्वच्छता ही निरंतर चालणारी प्रक्रिया असल्याने नागरिकांकडून स्वच्छताविषयक विविध गोष्टींचे पालन केले जावे व स्वच्छता ही अंगभूत सवयाची गोष्ट व्हावी हा महानगरपालिकेचा प्रयत्न असल्याचे महापालिका आयुक्त श्री. अभिजीत बांगर यांनी स्पष्ट केले. विष्णुदास भावे नाट्यगृह येथे विविध स्वयंसेवी संस्था, महिला मंडळे, महिला बचत गट, ज्येष्ठ नागरिक संघटना यांच्या प्रतिनिधींशी पॉवर पॉईट प्रेझेन्टेशनव्दारे सादरीकरण करीत स्वच्छता कार्यात विविध संस्थांच्या सहभागाविषयी आयुक्तांनी थेट संवाद साधला.*

स्वच्छतेमधील कामगिरी उंचाविण्यासाठी नागरिकांचा संपूर्ण सहभाग अत्यंत महत्वाचा असून सध्या ब-याच स्वयंसेवी संस्था स्वच्छताविषयक विविध बाबींमध्ये महानगरपालिकेसोबत सक्रीय आहेत अशी माहिती देतानाच आयुक्तांनी त्यामध्ये वाढ व्हावी यादृष्टीने आजचा संवाद महत्वाचा असल्याचे स्पष्ट केले.

स्वच्छता सवयींमध्ये बदल करताना आपण आज नेमके कोणत्या पातळीवर आहोत याचा विचार करण्याची गरज असून आपल्याला कोणते लक्ष्य साध्य करायचे आहे हे निश्चित करून त्या दिशेने वाटचाल करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन आयुक्तांनी यावेळी केले.

'स्वच्छ सर्वेक्षण 2022' ला सामोरे जाताना रिसायकलींग मार्ट, आत्मनिर्भर सोसायटी, लोकसहभागातून सार्वजनिक जागांचे सुशोभिकरण, रस्ते दत्तक योजना, उद्यानांच्या कडेला पेट कॉर्नर निर्मिती, सर्व वॉर्डमध्ये स्वच्छता कॉर्नर स्वरूपातील सेल्फी पॉईंट्स निर्मिती, प्लॉग रन, झिरो वेस्ट वॉर्ड, स्वच्छ चॅम्पियन असे नानाविध नाविन्यपूर्ण उपक्रम महानगरपालिकेने हाती घेतले असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर लोकसहभाग मिळावा याकरिता स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन काम करावे असे आवाहन आयुक्तांनी उपस्थित संस्था प्रतिनिधींना केली.

नंबर वनची क्षमता असणारे आपले नवी मुंबई शहर असून आपल्या शहराकडून राज्य व राष्ट्रीय पातळीवर मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जातात. त्यामुळे स्वच्छतेबाबत आपण करू तितके काम कमीच असून स्वच्छतेबाबतच्या अनेक लहान लहान गोष्टी आपल्याला उद्दिष्टपूर्तीकडे नेऊ शकतात असा विश्वास व्यक्त करीत आयुक्तांनी स्वयंस्फुर्तीने काम करतील अशा संस्थांचा या स्वच्छता कार्यात सहभाग गरजेचा असल्याचे सांगितले. याकरिता विविध क्षेत्रात कामे करणा-या स्वयंसेवी संस्थांकडून आपापल्या क्षेत्रात सहभाग, निरीक्षण, प्रचार व प्रशिक्षण या 4 गोष्टींच्या अनुषंगाने काम करण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

*महानगरपालिका आपल्या परीने स्वच्छता कार्य करीत आहे, त्याला स्वयंसेवी संस्थांची जोड मिळाली तर शहरात व्यापक स्वच्छता चळवळ उभी राहील आणि सर्वेक्षणाच्या पलिकडे जाऊन आपण नंबर वनचे शहर म्हणून सिध्द होऊ असा विश्वास व्यक्त करीत महापालिका आयुक्त श्री. अभिजीत बांगर यांनी लोकसहभाग वाढीकरिता एकत्र मिळून काम करूया असे आवाहन उपस्थित संस्था प्रतिनिधींना केले.*

*यावेळी विष्णुदास भावे नाट्यगृहामध्ये मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्वयंसेवी संस्था, महिला मंडळे, महिला बचत गट, ज्येष्ठ नागरिक संघटना प्रतिनिधींनी आयुक्तांशी थेट संवाद साधत विविध सूचना केल्या तसेच स्वच्छताविषयक उपक्रमात पुढाकार घेत काम करण्याची ग्वाही दिली.*

# गर्दीने भरलेल्या लोकलमध्ये चढली अन्...

ठाणे: रेल्वे स्थानकामधील सीसीटीव्ही फुटेजमुळे धावत्या ट्रेनमधील गर्दीचा गैरफायदा घेऊन चोरी करणाऱ्या महिलेला अटक करण्यात रेल्वे पोलिसांना यश आले आहे. ३१ वर्षीय महिला आरोपीला दिवा येथून अटक केली आहे. तिच्याकडून तीन लाख ४३ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. रेल्वे पोलिसांनी सोमवारी ही माहिती दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, रेल्वे पोलिसांनी दिवा येथून एका ३१ वर्षीय महिलेला अटक केली आहे. गर्दी असलेल्या धावत्या ट्रेनमध्ये प्रवाशाचे सोन्याचे दागिने चोरी केल्याचा तिच्यावर आरोप आहे. तीन लाख ४७ हजार रुपये या दागिन्यांची किंमत असल्याचे सांगण्यात आले. रेल्वे पोलिसांनी ही माहिती दिली. त्यातील ३.४३ लाख रुपये किंमतीचे दागिने हस्तगत केले आहेत.

मध्य रेल्वेवरील दिवा आणि ठाणे या रेल्वे स्थानकांदरम्यान ७ डिसेंबर रोजी सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास ही घटना घडली होती. सीसीटीव्ही फुटेजमध्ये चोरी करणाऱ्या महिला दिसून आली. सीसीटीव्ही फुटेजमध्ये ही महिला त्या प्रवाशाचा प्लॅटफार्मवर असल्यापासूनच पाठलाग करत असताना दिसून आली. त्यानंतर ती गर्दी असलेल्या ट्रेनमध्ये चढली. रेल्वे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली.

## पृष्ठ १ वरुन

### अजनीत सलूनमध्ये सुरु होता देहव्यापार,

अमित मिश्रा (वय 30), ज्योती मिश्रा (वय 28) असे माथेफिरुच्या हल्ल्यात जखमी झालेल्या पती पत्नीचे नाव आहे. ते दोघेही मूळचे उत्तर प्रदेश येथील राहणारे आहेत. हे जोडपं सध्या कामा निमित्त नालासोपारा पूर्व भावशेत पाडा येथे राहत होते. हल्ल्याचं कारण अस्पष्ट दोघांवर झालेल्या हल्ल्याचे नेमके कारण सध्या स्पष्ट झालेले नाही. याबाबत अनोळखी तरुणा विरोधात प्राणघात हल्ला केल्याप्रकरणी तुलिंज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीचा पोलिसांनी शोध सुरू केला आहे.

### मुंबईत 31 डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर

चालवल्याने किंवा अन्य कारणाने असंख्य घातपात, अपघात होत असतात. हे टाळण्यासाठी मुंबई पोलिसांकडून ऑपरेशन ऑल आऊट राबवण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत शुक्रवारी मध्यरात्री पोलिसांनी रस्त्यावर उतरत वाहनांची चेकिंग केली. तसेच वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर आणि प्रवासात मास्कचा वापर न करणाऱ्यांवर देखील कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान थर्टी फस्टच्या पार्श्वभूमीवर काही घातपात होऊ नयेत, यासाठी पोलिसांकडून रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा शोध घेण्यात येत आहे. ओमिक्रॉनची धास्ती कोरोनाची दुसरी लाट ओसरली आहे. मात्र त्यानंतर कोरोनाचा नवा व्हेरिएंट असलेल्या ओमिक्रॉनने जगभरात धुमाकूळ घातला आहे. भारतामध्ये देखील ओमिक्रॉनचे रुग्ण आढळून आले आहेत. कोरोनाच्या इतर व्हेरिएंटच्या तुलनेमध्ये याच्या प्रादुर्भावाचा वेग अधिक आहे, त्यामुळे गर्दी टाळण्याचे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. मात्र 31 डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर गर्दी होऊन कोरोनाच्या नियमांचे उल्लंघन झाल्यास रुग्ण वाढण्याची शक्यता आहे. असे होऊ नये यासाठी पोलिसांकडून खबरदारी घेतली जात असून, नागरिकांना कोरोनाच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### आधी महागड्या बाईक उचलायच्या

काढायचा. सापळा रचून अटक कल्याणच्या कोलशेवाडी परिसरात चेन स्नॅचिंग, दुचाकी चोरीच्या घटना वाढल्या होत्या. या पार्श्वभूमीवर कोळसेवाडी पोलिसांनी चार पथके नेमली आणि या चोरट्यांचा शोध सुरु केला. खबऱ्यांमार्फत त्यांना अलीहसन हा आंबिवली इराणी वस्तीत राहत असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांच्या पथकाने आंबिवली इराणी वस्तीत सापळा लावून अलीहसनला अटक केली. साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त त्याच्याकडून पाच मोटरसायकल, तीन साखळ्या असा 4 लाख 53 हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आतापर्यंत कल्याण-डोंबिवली भिवंडी , ठाणे मुंबई या ठिकाणी देखील त्याने चोऱ्या केल्याचे तपासात समोर आले असून पोलीस या प्रकरणी पुढील तपास करत आहेत अशी माहिती कल्याणचे एसीपी उमेश माने-पाटील यांनी दिली आहे. दरम्यान कल्याण नजीकच्या आंबिवली येथील इराणी वस्तीतून या आधी देखील अनेक सोनसाखळी चोरट्यांना अटक करण्यात आली आहे. अलीहसनच्या अटकेनंतर ही वस्ती पुन्हा एकदा पोलिसांच्या रडारवर आली आहे.

### अमित शहांचं आव्हान राऊतांनी

तेव्हा मी, मुख्यमंत्री, महाविकास आघाडी सरकारचे नेते या सर्वांना त्यांची दया आली आणि आश्चर्यही वाटलं असंही संजय राऊत म्हणाले. हिंदत्वाचा मुद्दा शिवसेने सोडला नाही संजय राऊत म्हणाले, हिंदुत्वाचा मुद्दा शिवसेनेने कधी सोडला नाही आणि सोडणारही नाही. 2014 साली आमच्यासारख्या प्रखर हिंदुत्ववादी पक्षाला दूर करताना सत्तेसाठी.. फक्त सत्तेसाठी आणि सत्तेचा वाटा जास्त मिळावा यासाठी 2014 साली शिवसेनेला दूर करा असं राज्यातील भाजप नेत्यांना खासगीत सांगणारे कोण होते? हे अमित शहांनी स्पष्ट करावं. तीन चिलखतं दूर करा आणि लढा महाराष्ट्राचं सरकार उत्तम चाललं आहे. केंद्राने प्रयत्न करुन सुद्धा सरकारचं एक कवचा सुद्धा उडालेला नाहीये याचं दु:ख आम्ही समजू शकतो. तुमच्या संपूर्ण यंत्रणा फेल गेल्या आहेत. आपण जे म्हणताय ना राजीनामा द्या आणि आमच्याशी आमने-सामने लढा... तुम्ही जी तीन-तीन चिलखतं घालून तुम्ही महाराष्ट्रात फिरताय ना? सीबीआय, ईडी आणि एनसीबी ही तीन चिलखतं घालून तुम्ही आमच्यावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करताय ना... ही चिलखतं दूर करा आणि आमच्याशी लढा. आम्ही छातीवर वार घेणारे आहोत आम्ही पाठीमागून हल्ले करत नाही. आम्ही समोरूनच लढतो आणि आत्तापर्यंत समोरुनच लढत आलो आहोत असंही संजय राऊत म्हणाले.

### शॉरमातून गोल्डबार, अंतर्वस्त्रातून

आलं आहे. जास्त दराने मुंबईत सोने विक्री 'या महिला गरीब कुटुंबातील आहेत. केनियात सोन्याच्या किमती स्वस्त असल्याने तिथे त्यांनी सोनं विकत घेतलं होतं. मुंबईत सोन्याचे भाव प्रचंड जास्त असल्याने चढ्या दराने विकण्याचा त्यांचा प्लॅन होता' असं सूत्रांनी सांगितलं. तस्करी होणारे सोने बहुतांश वेळा दुबई किंवा शारजातील असते, मात्र आफ्रिकन देशांतूनही सोन्याच्या तस्करीचं प्रमाण वाढत आहे. गेल्याच महिन्यात दुबईहून 1.71 किलो वजनाचे 77 लाख रुपये किमतीचे सोने तस्कर केल्याप्रकरणी दोघा प्रवाशांना मुंबई विमानतळावर अडवण्यात आले होते.

### Paytm Spoofing करून

नंबरबाबत तपास करून संशयित आरोपी नितेश ओमप्रकाश सिंग, वय २४ वर्षे पत्ता - मिरा रोड पुर्व, (भाड्याचे घर) यास ताब्यात घेवून चौकशी केली असता त्याने Paytm Spoofing करून व्यवहार पेमेंट केल्याचे भासवून संदीप शिंदे यांची आर्थिक फसवणुक केल्याची माहिती पोलिसांना दिली. सदर तक्रारी अर्जावरुन वरील नमुद संशयित आरोपी विरूध्द नयानगर पोलीस ठाणे येथे तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच नमुद आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. सायबर गुन्हे शाखा, मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडुन जनतेला आवाहन करण्यात येते की, मोबाईल क्रमांक ७९७७४ ७२४२० चा धारकाकडून अश्या प्रकारे Paytm Spoofing करून किंवा अन्य बनावट पेमेंट ॲपव्दारे ऑनलाईन व्यवहार करून आर्थिक फसवणुक झालेली असल्यास नया नगर पोलीस ठाणेस अथवा सायबर गुन्हे शाखा, मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधावा.

सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे कक्ष येथील पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, पोउपनिरी संतोष भिसे, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोअं/गणेश इलग, पोअं/सुशिल पवार, मपोशि/सुवर्णा माळी, मपोशि/ पल्लवी निकम यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

### अंधेरीत पाण्याने भरलेल्या

पडला. बांधकामाधीन इमारतीच्या तळमजल्यावर लग्नाचे आयोजन करण्यात आले होते

मुंबईतील अंधेरी (पश्चिम) येथे एसआरए इमारतीचे बांधकाम सुरु आहे. या इमारतीच्या लिफ्टसाठी तयार करण्यात आलेल्या खड्ड्यात पाणी साचले होते. इमारतीच्या आसपासच्या परिसरात असलेल्या झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांनी या ठिकाणी विवाह सोहळा आयोजित केला होता. कोणत्याही परवानगीशिवाय तळमजल्यावर कामगारांनी लग्नाचे आयोजन केले होते. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने कोणत्याही उपाययोजना करण्यात आल्या नव्हत्या. याच विवाह सोहळ्यात सहभागी होण्यासाठी मृत बालक आपल्या आई वडिलांसोबत आला होता. यावेळी खेळता खेळता तो लिफ्टच्या खड्ड्याजवळ गेला आणि तोल जाऊन खड्ड्यात पडला. विवाह सोहळ्यात जोरजोरात म्युझिक सुरु असल्याने मुलाच्या ओरडण्याचा आवाज कुणाला ऐकू गेला नाही.

## संपादकीय...



# जगज्जेत्याचा प्रेरणाक्षय...

वय वर्षे ३१ हे काही एखाद्या खेळाडूचा प्रेरणाक्षय होण्याचे वय नव्हे. बुद्धिबळात तर नाहीच नाही. रॉबर्ट ऊर्फ बॉबी फिशरने स्वहस्ते जगज्जेतेपदावर पाणी सोडले, पण ते चक्रमपणाच्या झटक्यातून! विद्यमान जगज्जेता मॅग्नस कार्लसनच्या बाबतीत तसे काही संभवत नाही. त्याला काही कोणा 'काळ्या सोव्हिएत साम्राज्या'शी टक्कर वगैरे घेण्याची गरज उरलेली नाही. २०१३ मध्ये चेन्नईत तत्कालीन जगज्जेता विश्वनाथन आनंदला तीन गुणांच्या फरकाने लीलया हरवून कार्लसन पहिल्यांदा जगज्जेता बनला. त्याच्या दोन वर्षे आधीच म्हणजे २०११ मध्ये कार्लसन जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर पोहोचला. २०१४ मध्ये पुन्हा एकदा आनंदलाच हरवून त्याने एका युगाचा अंत घडवून आणला. पुढे तीन वेळा वेगवेगळ्या पण खूपच तरुण प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करून तो गत सप्ताहात पाचव्यांदा जगज्जेता बनला. पारंपरिक बुद्धिबळाबरोबरच कार्लसन जलद (रॅपिड) आणि अतिजलद (ब्लिट्झ) या प्रकारांमध्येही जगज्जेता आहे. त्याच्याबाबतीत आता काहीही फार धक्कादायक असे राहिलेले नाही. आनंदला त्याने दोन वर्षांत दोनदा पराभूत केले, त्या वेळी त्याच्या अजेयत्वाची फारशी चाहूल बुद्धिबळ विश्लेषक आणि आजी-माजी बुद्धिबळपटूंना लागली नव्हती. कारण रूढार्थाने आनंद हा बुद्धिबळाच्या तरल परिप्रेक्ष्यात 'जुन्या' पिढीचे प्रतिनिधित्व करत होता. या पिढीने शिखर गाठण्यासाठी प्राधान्याने पुस्तकी ज्ञान आणि पटावरील सरावाचा वापर केला. शिवाय आनंद कार्लसनशी खेळला, त्या वेळी त्याने वयाची चाळिशी ओलांडलेली होती. याउलट कार्लसनने विशीत प्रवेश केला होता. या पिढीने लहान वयातच बुद्धिबळाच्या तयारीसाठी संगणकांचा, बहुकोट चालींचे अत्यंत सखोल विश्लेषण करू शकणाऱ्या प्रणालींचा आधार घेतला. अंत:प्रज्ञेला (इन्ट्यूिशन) अफाट संगणकीय तयारीची जोड दिल्यामुळे या पिढीचा पटावरील खेळाचा स्तर विलक्षण उंचावलेला आहे. त्यामुळे शारीरिक व मानसिक ऊर्जा, तसेच तयारी करण्याची क्षमता अशा अनेक निकषांवर कार्लसन पहिल्या सामन्यापासून वरचढ ठरला, जे सर्वथा अपेक्षितच होते. परंतु आणखी एक बाब कार्लसनच्या पथ्यावर पडणारी होती. ती होती प्रेरणा! आनंदसाठी जगज्जेतेपदाची नवलाई अशी फारशी राहिलेली नव्हती. २०१३ मधील लढत खेळेपर्यंत तो पाच वेळा जगज्जेता बनलेला होताच. याउलट कार्लसनसाठी जगज्जेतेपद – पारंपरिक प्रकारातील जगज्जेतेपद – हा इतर कोणत्याही आघाडीच्या बुद्धिबळपटूप्रमाणे सर्वाेच्च प्रेरणास्रोत होता. आज हाच स्रोत आटल्याची कबुली खुद्द कार्लसन देतो. त्यामुळे जगज्जेतेपद राखण्यातच त्याला रस उरलेला नाही, हे तर विलक्षण अद्भुतच.

आनंदनंतरचे कार्लसनचे तिन्ही प्रतिस्पर्धी जवळपास जगज्जेत्याला समवयस्क. २०१६ मध्ये रशियाचा सर्गेई कार्याकिन, २०१८ मध्ये अमेरिकेचा फॅबियानो करुआना आणि २०२१ मध्ये रशियाचा इयन नेपोम्नियाशी जगज्जेतेपदासाठी झुंजले. तिघेही कार्लसनप्रमाणेच संगणकीय पिढीचे प्रतिनिधी. पैकी कार्याकिन आणि करुआना यांच्याविरुद्ध १२ डावांच्या पारंपरिक टप्प्यात कार्लसनला विजय मिळवता आला नव्हता. तेथे विजेता ठरवण्यासाठी जलद डावांचा अवलंब करावा लागला. परवा जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत नेपोम्नियाशीविरुद्ध मात्र त्याने ७.५-३.५ (ही लढत १४ डावांची होती) असा जवळपास एकतर्फी विजय मिळवला. जलद डावांपर्यंत लढत गेलीच नाही. बुद्धिबळात गेल्या १०० वर्षांमध्ये इतकी एकतर्फी लढत पाहायला मिळाली नव्हती. परंतु सहाव्या डावापर्यंत तशी ती नव्हती. नेपोम्नियाशी जय्यत तयारी करून आला होता. तो बहुधा चमत्कार घडवणार अशी शंका काहींनी व्यक्तही करून झाली. सहावा डाव १३० चालींपर्यंत चालला. सायंकाळी सुरू झालेला हा डाव मध्यरात्र उलटून गेली तरी सुरू होता. १०० चालींपर्यंत पटावर साधारण बरोबरीची स्थिती होती. एखादा असता, तर बरोबरी मान्य करून पुढील दिवसाच्या तयारीसाठी किंवा विश्रांतीसाठी निघून गेला असता. कार्लसन अशांपैकी नाही! त्याचे आजवरचे सर्वांत लक्षवेधी वैशिष्ट्य म्हणजे, पटावर बरोबरीची स्थिती अशी काही असत नाही हा त्याचा हट्टाग्रह. त्यामुळे पटावरील स्थितीचे संगणकीय मूल्यांकन 'शून्य' म्हणजे 'ठार बरोबरी' असे दर्शवत असले, तरी कार्लसन बऱ्याचदा खेळत राहतो. या असीम लढाईसाठी आवश्यक अक्षय ऊर्जा हे कार्लसनचे आणखी एक वैशिष्ट्य. त्याचा खेळ फारसा आकर्षक नाही. 'मोझार्ट ऑफ चेस' वगैरे त्याच्या नावापुढे चिकटलेले बिरुद चुकीच्या गृहीतकावर आधारित आहे. बुद्धिबळातील 'एस्थेटिक्स' किंवा सौंदर्यभानाची तमा त्याने कधीही बाळगली नाही. चित्ताकर्षक सुरुवात करावी, मोहऱ्यांचे धडाधड बळी देत पटावर 'रक्तपात' घडवत स्वत:च्या प्रतिभेची आणि त्याहीपेक्षा बेडरपणाची चुणूक दाखवत टाळ्या मिळवाव्यात हा कार्लसनचा खाक्या नाही. सर्जनशीलतेपेक्षाही त्याची गणनक्षमता अत्युच्च कोटीची आहे. गुंतागुंतीच्या स्थितीतही कार्लसनच्या बहुतेक चाली शक्तिशाली संगणक प्रणालींना 'मान्य' असतात!

# चिनी सावकारी!




मुदतीनंतरही कर्जफेड करू न शकणाऱ्या देशांमधील राष्ट्रीय मालमत्ता ताब्यात घेत असल्याच्या वृत्ताने, चीनच्या सावकारीची चर्चा सध्या सुरू आहे. चिनी कर्जांच्या विळख्यात सापडलेले अनेक देश यामुळे चिंताग्रस्त झाले आहेत.

अडचणीत असणाऱ्यांना चढ्या व्याजदराने पैसे देण्याचा आणि कर्ज फेडण्यात अपयशी ठरल्यास त्यांच्याकडील मालमत्ता ताब्यात घेण्याचा प्रकार नवा नाही. अनेक खासगी सावकार तसे करीत असतात; परंतु आंतरराष्ट्रीय स्तरावर एक देश दुसऱ्या देशाच्या बाबतीत हे करू शकतो? जागतिक महासत्ता होण्याच्या आकांक्षेने झपाटलेला चीन अशा प्रकारची सावकारी करीत असून, त्याच्याकडून कर्ज घेतलेल्या देशांत याबाबत चिंता निर्माण होते आहे. मुदतीनंतरही कर्जफेड करू न शकणाऱ्या देशांमधील राष्ट्रीय मालमत्ता चीन आपल्या ताब्यात घेत असल्याच्या बातम्या येत आहेत. चीन आणि संबंधित देश अशा घटनांचा इन्कार करीत असले, तरी असे देश यामुळे संकटात येत असल्याचे चित्र आहे. पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मदतीचा हात पुढे करीत चीनने दिलेल्या कर्जांच्या ओझ्याखाली दबलेल्या देशांमधील वाढती चिंता खूप काही सांगून जाणारी आहे. आशिया, आफ्रिका आणि युरोप खंडांतील देशांशी रस्ते व सागरी महामार्गांनी जोडण्यासाठी हाती घेतलेल्या 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह' (बीआरआय) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा एक भाग म्हणून चीन अनेक देशांत गुंतवणूक करतो आहे, त्या देशांमधील विकास प्रकल्पांची कामे चिनी कंपन्यांनाच दिली जातील हे पाहतो आहे; तसेच तेथील कच्चा माल आपल्या देशात नेऊन त्यावर प्रक्रिया करून पक्का माल त्याच देशांत निर्यात करतो आहे. याद्वारे चीन कर्जाचा सापळा तयार करत असून, अनेक देश त्यामध्ये अडकत आहेत. त्यामध्ये आफ्रिकी देशांचे प्रमाण अधिक आहे. युगांडाचाही त्यात समावेश असून, त्याबाबतच्या वृत्तामुळे चिनी सावकारी सध्या चर्चेत आहे.

युगांडा हा आफ्रिकेतील एक गरीब देश. एंटेबी हे तेथील एकमेव आंतरराष्ट्रीय विमानतळ. त्याच्या विस्तारासाठी युगांडा आणि चीन यांच्यात २०१५मध्ये करार झाला. त्याद्वारे चीनने वीस कोटी डॉलरचे कर्ज युगांडाला दिले. मदतीला धावून येणाऱ्या चीनला सन्मानपूर्वक वागणूक देण्यासाठी युगांडाने करारात मालमत्ता संरक्षणाच्या अटींचा समावेश केला नाही. हीच चूक युगांडाला आता महागात पडते आहे. कर्जाची परतफेड करता येत नसल्याने, एंटेबी विमानतळ चीनला देण्याची वेळ युगांडावर येऊ शकते. नजीकच्या भविष्यात युगांडाला हे हस्तांतरण करावे लागणार असल्याचे याबाबतच्या वृत्तात म्हटले आहे.

युगांडा आणि चीन या दोन्ही देशांनी यात तथ्य नसल्याचे म्हटले असले, तरी चीनबरोबर करार करताना योग्य ती दक्षता घ्यायला हवी होती, अशी कबुली युगांडाच्या अर्थमंत्र्यांनी दिली आहे. एंटेबी विमानतळाच्या करारात चुका राहिल्यानेच ही परिस्थिती ओढवली असल्याचे त्यांनी सूचित केले आहे. कर्जाची परतफेड झाल्यानंतर चीन कदाचित मालमत्ता जप्त करण्याचे पाऊल उचलणार नाही; परंतु तो वसुली केल्याशिवाय सोडणारही नाही, असे मत आफ्रिकी देशांतील तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. चिनी कर्जाच्या सापळ्यातून शक्य तितक्या लवकर सुटका करून घेण्याचा सल्लाही ते देत आहेत.

आफ्रिकेतील ५४ पैकी ५० देशांनी २००९ ते २०१९ या काळात चीनकडून दीडशे अब्ज डॉलरहून अधिक रकमेची कर्जे घेतली आहेत. नव्या सहस्रकाच्या सुरुवातीपासूनच चीनने आफ्रिका खंडावर लक्ष केंद्रीत केले असले, तरी 'बीआरआय' प्रकल्प हाती घेतल्यापासून बीजिंगने गती वाढवली आहे. बहुतेक आफ्रिकी देशांत रस्त्यांचे मोठे जाळे नाही. वीज प्रकल्पही पुरेसे नाहीत. सिंचन असो की वाहतूक, दूरसंचाराचे जाळे असो की दूरचित्रवाणी सेवा अशा विविध सुविधा पुरविण्यात ते देश कमी पडत आहेत. तिथे उद्योग उभारण्यात अडचणी आहेत. कच्च्या मालावर प्रक्रियाही होत नाही; त्यामुळे अन्य देशांशी व्यापारालाही मर्यादा आहेत. या देशांना विकासमार्गावर जाण्यासाठी पायाभूत सुविधांपासून उद्योगांपर्यंत अनेक बाबींची उभारणी गरजेची आहे. ती भागविण्यासाठी चीन पुढे सरसावला. त्याने कर्जे दिली. चिनी कंपन्यांना या देशांचे दरवाजे सताड उघडले गेले. चीनच्या सहकार्यामुळे गुंतवणुकीचा ओघ येईल, कारखाने उभारले जातील आणि निर्यात वाढेल, अशी स्वप्ने आफ्रिकी नेत्यांनी पाहिली.

प्रत्यक्षात सुरुवातीच्या मदतीनंतर चीनने त्या देशांवरील पकड घट्ट केली आणि गुंतवणूक कमी करत नेली. २०१९पासून चीनची 'बीआरआय'मधील गुंतवणूक ५४ टक्क्यांनी कमी झाली असून, आफ्रिकी देशांत पायाभूत सुविधांचा कोणताही नवा प्रकल्प सुरू केलेला नाही. २०१८मध्ये आफ्रिकी देशांना शंभर अब्ज डॉलरच्या मदतीचे आश्वासन देऊन, प्रत्यक्षात त्याच्या २५ टक्केच गुंतवणूक चीनने केल्याची आकडेवारी आहे. आफ्रिकी देशांकडून चीनला होणारी निर्यात वाढत नसून, घटत आहे. २०१९मध्ये व्यापारातील ही तूट १७ अब्ज डॉलरपर्यंत गेली होती.

युगांडा, झांबिया, केनिया यांसह अनेक देशांना चीनच्या गुंतवणूक नीतीचा कटू अनुभव येतो आहे. श्रीलंकेनेही तो घेतला आहे. पाकिस्तान आणि चीन यांच्यातील संबंध सध्या खूपच मधुर आहेत; परंतु चिनी कर्जाच्या सापळ्यात सापडल्यास काय परिस्थिती होते, याकडे तेथील अभ्यासक लक्ष वेधत आहेत. कमालीच्या आर्थिक अडचणीत असलेल्या पाकिस्तानला चीनकडून मदत घेण्याशिवाय सध्या तरी पर्याय नाही; तथापि तिथेही चिनी सावकारीबद्दल चिंता व्यक्त होत आहे. चीनची ही नीती किती काळ टिकणार आणि त्याचे काय परिणाम होणार, हे पाहावे लागेल.

## घणसोली विभागातील अनधिकृत बांधकामांवर तोडक कारवाई



नवी मुंबई महानगरपालिका विभाग कार्यालय घणसोली कार्यक्षेत्रातील कौलआळी शौचालया लगत, STP केंद्रासमोर, से.16, घणसोली येथे पहिल्या मजल्याचे आरसीसी बांधकाम प्रगतीपथावर होते तसेच अर्जूनवाडी रस्त्यालगत, अर्जूनवाडी, घणसोली याठिकाणी तळमजला आरसीसी कॉलमचे काम प्रगतीपथावर असल्याचे निदर्शनास आले होते. या दोघांनी नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही पुर्व परवानगी न घेता अनधिकृतपणे बांधकाम सुरू केले होते. सदरील अनधिकृत बांधकामांस घणसोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 54 अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते. परंतू त्यांनी सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते. या दोन्ही अनधिकृत बांधकामांवर घणसोली विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. त्यानुसार दोनही अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आलेली आहेत. या धडक मोहिमेसाठी घणसोली विभागातील अधिकारी / कर्मचारी, मजूर-11, जेसीबी-1, ब्रेकर-2, गॅस कटर-1 तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलिस पथक तैनात होते.

यापूढे देखील अशाप्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## शहरातील गुन्ह्यांच्या प्रमाणात वाढ

शहर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील १७ पोलिस ठाण्यांत या वर्षात एकूण आठ हजार गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण वाढलेले असल्याचे दिसून येत असून, करोना प्रतिबंधात्मक कारवाईसह पोलिसांनी केलेल्या अन्य कारवायांमुळे हा आकडा वाढलेला असल्याची माहिती समोर आलेली आहे.

शहरात २०२० मध्ये करोनामुळे लॉकडाउन होता आणि या काळात नोव्हेंबरपर्यंत साधारणत: सहा हजार ८४४ गुन्हे दाखल करण्यात आले होते. तर, २०१९मध्ये नोव्हेंबरपर्यंत साधारणत: ७३३२ गुन्हे दाखल झाले होते. या गुन्ह्यांमध्ये खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, तांत्रिक दरोडा, दरोड्याची तयारी, जबरी चोरी, मंगळसूत्र चोरी, घरफोडी, सर्व प्रकारच्या चोऱ्या, मोटार वाहन चोरी, मोबाइल चोरी, गर्दी मारामारी, बलात्कार, दुखापत, सरकारी कर्मचाऱ्यांवरील हल्ला अशा गुन्ह्यांसह विविध कायद्यांतर्गत करण्यात आलेल्या कारवाई, अपघातासह अन्य कारवाईंतर्गत गुन्हेही दाखल करण्यात आलेले आहेत.

या वर्षी एक जानेवारीपासून ते १९ डिसेंबरपर्यंत शहर पोलिस आयुक्तालयात किरकोळ गुन्ह्यांसह गंभीर गुन्हे, महिला विषयक गुन्हे, मोटारवाहन चोरी, विविध कारवाई अशी एकूण आठ हजार ९३७ गुन्हे १७ पोलिस ठाण्यांतर्गत दाखल करण्यात आलेले आहेत. यात सायबर आणि आर्थिक गुन्ह्यांचा समावेश आहे.

दररोज साधारण: २५ गुन्हे दाखल

गेल्या वर्षभरात विविध पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांचा विचार केल्यास दररोज औरंगाबाद शहर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत साधारणत: २५ गुन्हे दाखल होत आहे.

या गुन्ह्यांमध्ये सर्व प्रकारचे गुन्हे तसेच अपघातांचे गुन्हे दाखल करण्यात येत आहे.

## वाहतूक पोलिसाला फरफटत नेले

नियमभंग करणाऱ्या चालकांविरुद्ध कारवाई सुरू असताना एका कारचालकाने वाहतूक शाखेच्या पोलिसाला ५० फुटांपर्यंत फरफटत नेले. ही खळबळजनक घटना शनिवारी दुपारी २ वाजताच्या सुमारास रामदासपेठेतील कॅनल रोडवर घडली. या घटनेने परिसरातील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. हरीश शंकर भुजाडे (रा. इतवारी) असे कारचालकाचे नाव आहे.

शनिवारी दुपारी २ वाजताच्या सुमारास हरीश हे एमएच-३१-सीपी-९५९४ या क्रमांकाच्या कारने जात होते. कारमध्ये दोन महिला होत्या. त्यापैकी एकीला मधुमेहाचा आजार होता. हरीश हे तिला डॉक्टरकडे घेऊन जात होते. मॉरिस कॉलेज टी पॉइंट चौकात हरीश यांनी सिग्नल तोडला. याबाबत वाहतूक पोलिसांना माहिती मिळाली. वाहतूक शाखेचे पोलिस शिपाई सागर हिवराळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी कारचा पाठलाग केला. सिग्नल बंद असल्याने कार पंचशील चौकात थांबवली. याचवेळी सागर तेथे पोहोचले. ते कारचे छायाचित्र काढायला लागले. सिग्नल सुरू झाला. हरीश यांनी कारचा वेग वाढविला. सागर यांनी हरीश यांना कार थांबविण्याचा इशारा केला. मात्र, हरीश यांनी कार थांबविली नाही. सागर हे कारच्या बोनेटवर चढले. चालकाने सुमारे ५० फुटापर्यंत त्यांना फरफटत नेले.

**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**
**Water Supply Department**
Indira Gandhi Bhavan, Chatrapati Shivaji Maharaj Marg,
Bhayandar (W) 401101, Tal. Dis – Thane, 28192828

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

No.MNP/WS/37/2021 -22 Date – 16/12/2021

**// Tender Notice //**

Mira – Bhaiander Municipal Corporation's Water Supply Department has invited the tender for various works under water supply. The tender documents are available on http:/Mahatenders.gov.in website from 21/12/2021 to 04/01/2022 till 12.00 hrs. Tender shall submitted on http:/Mahatenders.gov.in website on or before 04/01/2022 upto 1.00 hrs.

**"100 टक्के मतदान ! हिच लोकशाहीची शान !"**

Sign/-
**Executive Engineer**
**Water Supply Department**
**Mira Bhayander Municipal corporation**

MBMC/PRo/409/2021-22
Date : 16/12/2021

पोलीस बातमी पत्र
संमिश्र
मुंबई, मंगळवार २१ ते २७ डिसेंबर २०२१


# उत्तन येथील मॅजिक किचन हॉटेलवर महानगरपालिकेची तोडक कारवाई











मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक. १ कार्यक्षेत्रा अंतर्गत मौजे उत्तन येथील
१) मॅजिक किचन हॉटेल २) पत्रा शेड ३)10 रूम ४) टेरेसवरील पत्रा शेड ५) बांधकामांवर आयुक्त श्री. दिलीप ढोले यांच्या आदेशानुसार दिनांक १७ डिसेंबर रोजी उपायुक्त (अतिक्रमण) श्री. मारुती गायकवाड यांच्या उपस्थितीत कारवाई करण्यात आली. सदर कारवाईस अतिक्रमण विभाग प्रमुख श्री. नरेंद्र चव्हाण, सहा. आयुक्त प्रभाग समिती क्रमांक. १ श्री. प्रभाकर म्हात्रे, प्रभाग समिती क्रमांक. 2, श्रीम. प्रियंका भोसले, प्रभाग समिती क्रमांक. ४ श्रीम. कांचन गायकवाड, प्रभाग समिती क्र. ५ श्री.चंद्रकांत बोरसे, प्रशांत लांगे वरिष्ठ पोलिस निरिक्षक उत्तन सागरी अतिक्रमण विभागातील माणिक पाटील, वरीष्ठ पोलीस निरीक्षक , कनिष्ठ अभियंता, प्रभाग क्र. १
श्री. योगेश भोईर व श्री. संदीप जटाळकर, प्रभाग क्र. २ श्री. वैभव कुलथे, फेरीवाला पथक प्रमुख प्रभाग क्र. १ श्री. राजेन्द्र माने, प्रभाग क्र. २
श्री. राकेश त्रिभुवन, प्रभाग क्र. ३ प्रशांत पाटील, प्रभाग क्र. ५ श्री.भैरव नाईक, प्रभाग क्र. ६
श्री. वसंत पेंढारे, पोलिस कर्मचारी, अतिक्रमण विभागातील कर्मचारी तसेच म. सु. ब. हे उपस्थित होते.

## अक्सा बीचजवळ कारचा भीषण अपघात, एकाचा मृत्यू, 6 जण जखमी




मुंबई : नागपुरातील विचित्र अपघातानंतर आता मुंबईतून अपघाताची बातमी समोर आली आहे. मुंबईत मालाडच्या अक्सा बीचजवळ कारचा अपघात झाला आहे. हा अपघात इतका भीषण होता की यात एकाचा मृत्यू झाला असून 6 जण जखमी झाले आहेत. या अपघाताची पोलिसांनी नोंद घेतली असून अधिक तपास सुरु आहे.

**कसा झाला अपघात?**

मालाडच्या अक्सा किनाऱ्याजवळ काही जण वाढदिवसाच्या पार्टी करण्यासाठी आले होते. यावेळी कारचालकानं नियंत्रण सुटून भीषण अपघात झाला. या अपघातात एकूण 6 जण जखमी झाले आहेत. तर एकाचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली आहे. या अपघाताचा पोलिसांनी पंचनामा केला असून या अपघातप्रकरणी आता पोलीस पुढील तपास करत आहेत.

**सकाळी नागपुरात झाला होता अपघात!**

दरम्यान, इकडे नागपुरातही रविवारी सकाळी अपघात झाला होता. कार रिव्हर्स घेताना वाहन चालकाने बाळगलेली निष्काळजी रस्त्यावरील तरुणाला चांगलीच महागात पडली. ड्रायव्हरने ब्रेकऐवजी अ‍ॅक्सिलरेटर दाबल्यामुळे पार्किंगमधून गाडी बाहेर काढताना ती जोरदार वेगाने मागे आली आणि कारने एकाला चिरडलं होते. यामध्ये एक तरुण गंभीर जखमी झाला, तर दोघे जण थोडक्यात बचावले होते. नागपुरात घडलेली ही घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाली. नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यात मुख्य रस्त्यावर ही घटना घडली आहे. मेन रोडच्या जवळच संबंधित चारचाकी गाडी पार्क करण्यात आली होती. ड्रायव्हर ती काढण्याचा प्रयत्न करत असताना हा भीषण अपघात झाला होता.

## मटण कापण्याच्या सुरीने पत्नीची हत्या, पतीची तलावात उडी, दाम्पत्यातील वादाचं कारण काय?



भिवंडी : पत्नीची हत्या केल्यानंतर पतीने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहरात ही धक्कादायक घटना घडल्याची माहिती आहे. चारित्र्याच्या संशयातून पतीने मटण कापण्याच्या सुऱ्याने पत्नीला संपवल्याचा आरोप आहे.

**काय आहे प्रकरण?**

पत्नीची हत्या केल्यानंतर पतीने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. तलावात उडी मारुन आरोपी पतीने आपलं आयुष्य संपवण्याचा प्रयत्न केला. मात्र स्थानिकांनी पाण्यात उड्या मारुन त्याला वाचवलं आणि पोलिसांच्या स्वाधीन केलं. आनंद वाघमारे असे पत्नीची हत्या करून आत्महत्या करणाऱ्या आरोपीचे नाव आहे.

**पत्नीच्या चारित्र्यावर वारंवार संशय**

आरोपी पती आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर वारंवार संशय घेत होता. यावरुन दोघांमध्ये अनेक वेळा खटकेही उडत होते. रविवारी पतीने रागाच्या भरात मटण कापण्याच्या सुऱ्याने पत्नीच्या पोटावर आणि गळ्यावर वार केले.

**पत्नीच्या हत्येनंतर आत्महत्येचा प्रयत्न**

पत्नीला गंभीर जखमी अवस्थेत घरातच सोडून पती बाहेर पडला. त्यानंतर त्याने घरापासून काही अंतरावरच असलेल्या वऱ्हाळ तलावात उडी मारली. पत्नीच्या हत्येनंतर आत्महत्या करण्याचा पतीचा डाव होता.

**स्थानिकांनी आरोपी पतीला तलावातून वाचवलं**

हा प्रकार पाहून तलाव परिसरात उपस्थित असलेल्या काही स्थानिक नागरिकांनी पटापट पाण्यात उड्या मारल्या. आरोपी पतीला तलावातील पाण्यातून वाचवत पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. पोलिसांनी हत्येसाठी वापरलेला सुराही जप्त केला आहे.

**अल्पवयीन मुलीचा बालविवाह रोखला**

दुसरीकडे, भिवंडीत 14 वर्षीय अल्पवयीन मुलीचा होणारा बालविवाह वेळीच रोखण्यात यश आलं आहे. हळदी समारंभ झाल्याचे लक्षात येताच अंगणवाडी सेविकेने चाईल्ड हेल्पलाईनवर तक्रार केल्याने महिला आणि बाल विकास विभागाने रविवारी होणारा बालविवाह रोखण्यात यश मिळवले.

## भिवंडीत पोटच्या मुलीवर बापाकडून बलात्कार, 14 वर्षांची पीडिता गरोदर

भिवंडी : बापाने आपल्या पोटच्या मुलीवर बलात्कार केल्याची लज्जास्पद घटना उघडकीस आली आहे. अल्पवयीन मुलगी गरोदर राहिल्याने डॉक्टरांनी नराधम पित्याला पोलिसांच्या स्वाधीन केले. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहरात ही माणुसकीला लाजवणारी घटना घडल्याची माहिती आहे. पीडिता केवळ 14 वर्षांची आहे.

**काय आहे प्रकरण?**

भिवंडीतील भोईवाडा चाळीत राहणाऱ्या बापाने आपल्या पोटच्या मुलीवर बलात्कार केला. मुलीची प्रकृती ठीक नसल्याने तिला तपासणीसाठी धामणकर नाका येतील सोनोग्राफी सेंटरमध्ये नेण्यात आले होते. त्यावेळी पीडिता गरोदर असल्याची धक्कादायक बाब समोर आली.
डॉक्टरांच्या सतर्कतेमुळे प्रकरण उघडकीस



प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेत डॉक्टरांनी अल्पवयीन मुलगी आणि तिच्या वडिलांना घेऊन थेट भोईवाडा पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी तात्काळ पीडितेच्या आईला बोलावून घेत तिच्यासमोर पीडितेकडे चौकशी केली. त्यावेळी पीडित मुलीने दोन महिन्यांपूर्वी आपल्या वडिलांनी शारीरिक अत्याचार केल्याचे सांगितले.

**नराधम बापाला अटक**

भोईवाडा पोलिसांनी नराधमाच्या विरोधात बलात्कारासह पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. आरोपी पित्याला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

**अल्पवयीन मुलीचा बालविवाह रोखला**

दुसरीकडे, भिवंडीत 14 वर्षीय अल्पवयीन मुलीचा होणारा बालविवाह वेळीच रोखण्यात यश आलं आहे. हळदी समारंभ झाल्याचे लक्षात येताच अंगणवाडी सेविकेने चाईल्ड हेल्पलाईनवर तक्रार केल्याने महिला आणि बाल विकास विभागाने रविवारी होणारा बालविवाह रोखण्यात यश मिळवले.

## पुण्यात 'तुमच्या मुलाने आंतजातीय विवाह केला' असे म्हणत बहिष्कार टाकणाऱ्या जातपंचायतीच्या 5 जणांवर गुन्हा दाखल




पुणे – शहरात तुमच्या मुलाने आंतरजातीय लग्न केले. त्यामुळे तुमच्या कुटुंबावर बहिष्कार घातल्याचे सांगणाऱ्या जातपंचायतीतील 5 जणांवर पुण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील दत्तवाडी पपोलीस स्थानकात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित जातपंचायतीचा कार्यक्रम अरणेश्वर गवळीवाडा येथील मुक्तांगण शाळेच्या हॉलमध्ये घडला आहे. याप्रकरणी महाराष्ट्र समाजिक बहिष्कारापासून व्यक्तींचे संरक्षण कायद्यांतर्गत (Social Exclusion Act) अर्जुन रामचंद्र जानगवळी, हरीभाऊ हिरणवाळे, चंद्रकांत उर्फ बाळु औरंगे व त्यांचे इतर दोन साथीदार यांच्यावर दत्तवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी रामचंद्र भाऊसाहेब पंगुडवाले (वय-69 रा.गवळीवाडा, खडकी) यांनी दत्तवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## लेन्सकार्टला 93 लाखांचा गंडा घालणारा एक जण जाळ्यात, मुख्य आरोपीचा शोध सुरु

औरंगाबादः लेन्सकार्ट या गॉगल्स व चश्मे विक्री करणाऱ्या कंपनीच्या स्टोअरमधून ग्राहकांनी खरेदी केलेल्या सामानाचे पैसे स्वतःच्या खात्यावर वळते करून कंपनीला 93 लाखांचा गंडा घालणाऱ्या दोघांपैकी एकाला औरंगाबाद पोलिसांनी (Cyber police) अटक केली आहे. ग्राहकांना कंपनीच्या बँक खात्याचा नंबर देण्याऐवजी स्वतःच्या खात्याचा क्यूआर कोड स्कॅन करायला सांगून सेल्समनने 93 लाख रुपयांची फसवणूक केल्याचे शनिवारी उघडकीस आले होते. या प्रकरणी पोलिसांनी रविवारी एकाला अटक केले.

काय आहे नेमके प्रकरण?

सिडको परिसरातील रहिवासी शिरीषकुमार प्रतापराव पगारे यांनी लेन्सकार्ट कंपनीची गॉगल्स व चष्म्याच्या स्टोअर्सची फ्रँचायझी घेतली आहे. 4 नोव्हेंबर 2019 रोजी लेन्सकार्ट स्टोअरला मॅनेजर म्हणून मयूर देशमुख तर सेल्समन म्हणून दामोदर याची नियुक्ती केली




होती. 10 नोव्हेंबर रोजी लेन्सकार्टच्या एरिया मॅनेजरने पगारे यांना फोन करून ग्राहकांना विक्री केलेल्या सामानाच्या कार्ड पेमेंटची काही रक्कम कंपनीकडे जमा झाली नसल्याचे सांगितले. पगारे हे ओमानमध्ये असल्याने त्यांनी भाऊ सुशील याला चौकशी करण्यास सांगितले. त्यांनी मॅनेजर आणि सेल्समनकडे चौकशी केली असता सदर प्रकार उघडकीस आला.

एकाला अटक, मुख्य आरोपी फरार

ग्राहकांकडून पैसे घेताना सेल्समन आणि मॅनेजरने ते पैसे आपल्या खात्यावर वळते करून घेतले. या प्रकरणी सायबर पोलिसांनी एकाला अटक केली.

दामोदर वामन गवई असे आरोपीचे नाव असून मुख्य आरोपी मयूर देशमुख फरार आहे. या प्रकरणात शमिता ऑरगॅनिक इंडिया कंपनीचे संचालक शिरीष कुमार पगारे यांनी फिर्याद दिली. त्यानुसार, फिर्यादिने कंपनीमार्फत लेन्सकार्ट सोल्युशन्स या गॉगल्स व चष्मे विक्री करणाऱ्या कंपनीची फ्रँचायजी घेतलेली आहे. त्यांच्या स्टोअरमध्ये काम करणाऱ्या मॅनेजर व सेल्समनविरोधात या प्रकरणी गुन्हे दाखल आहेत. पोलीस या गुन्ह्याचा सखोल तपास करत असून मुख्य आरोपीचा शोध घेतला जात आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898